# पितामह

अनंत तिबिले

रिया पब्लिकेशन्स्

**पितामह : अनंत तिबिले**

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ४३०/-

# पितामह

# अंतरंगाआधी...

रामायण आणि महाभारत हे हिंदू धर्मियांचे परमपवित्र ग्रंथ. आज या दोन्ही ग्रंथांना देव्हाऱ्यात-मंदिरात स्थान लाभलेले आहे. या दोन्ही ग्रंथांच्या ठायी प्रत्येक हिंदू धर्मियांची अपार श्रद्धा, दृढ विश्वास नि नितांत आदर वसतो आहे. या ग्रंथाची पारायणं करणारी माणसंही काही थोडीथोडकी नाहीत हिंदू धर्मियांत.

अर्थात यात काही वावगं आहे असं मुळीच नाही. या धर्मग्रंथांवर श्रद्धा ठेवणं, त्यांची पूजा बांधणं हे प्रत्येक हिंदू धर्मियाचं आद्य कर्तव्य आहे.

आज काही श्रद्धावंत हे दोन्ही ग्रंथ म्हणजे हिंदू धर्मियांच्या उज्ज्वल इतिहासाची गाथा असंच समजतात. विचिकित्सक नजरेने या दोन्ही ग्रंथांकडे पाहिले की, महाभारतापेक्षा रामायण हा काहीसा काल्पनिक प्रकार वाटतो. वाल्मिकीसारख्या प्रतिभासंपन्न साहित्यिकाची एक अजोड कलाकृती असं मी स्वत:ही मानतो. तत्कालीन सामाजिक परिस्थितीचं नि सामान्य प्रजाजनांच्या सुखदु:खाच्या चित्रीकरणाचा लवलेशही नसलेली ही कलाकृती म्हणजे वाल्मिकीच्या उत्तुंग कल्पनाविलासाचा एक अत्युत्कृष्ट नमुना असे कुणालाही वाटले तर त्यात नवल वाटण्याचे काहीच कारण नाही.

रामायण म्हणजे आदर्श अशा असंख्य व्यक्तिमत्त्वांचे दर्शन घडविणारे एक अत्युत्कृष्ट प्रदर्शनच होय. रामायणाचा नायक प्रभूराम तर पुरुषोत्तम. पराक्रमी, सदाचरणी, एकवचनी, एकवाणी नि एकपत्निव्रत धारण केलेला आदर्श पुरुष. बंधुप्रेमास्तव राजप्रासाद, वैभव सोडून चौदा वर्षांचा वनवास पत्करणारा लक्ष्मण, पतीसाठी सर्व सुखांचा त्याग करणारी श्रीरामपत्नी जानकी, बंधुप्रेमास्तव चौदा वर्षे विजनवासात गेलेल्या लक्ष्मणाची सतत चौदा वर्षे प्रतीक्षा करणारी, राजप्रासादात वास्तव्य करूनही कण कण जळणारी लक्ष्मणपत्नी ऊर्मिला, राज्यलाभ झाला असतानाही राज्यत्याग करून श्रीरामावरच निष्ठा ठेवून राहणारा

भरत, श्रीरामभक्त हनुमान....एक की दोन सगळीच असामान्य, अलौकिक माणसं. पिढ्यान्‌पिढ्यांचा आदर्श बनून राहिलेली. पण त्याचबरोबर सर्वसामान्य मानवी जीवनाशी एकरूप न होणारी आणि म्हणून काहीशी काल्पनिक वाटणारी. रामायणाला इतिहास संबोधणारे त्याला इतिहास ही संज्ञा खुशाल बहाल करोत, पण मी मात्र त्याला इतिहास मानताना काहीसा अडखळेन. रामायणावरची निष्ठा तशीच ठेवून म्हणेन, 'रामायण हा इतिहास'हे काहीसं अशक्यच.

याउलट महाभारताचं आहे. महाभारत मूळ व्यासांची कलाकृती, नंतर त्यावर आणखीन संस्कार झाले. त्याला अनेक उपांगे-उपकथानके जोडण्यात आली...वृक्षाला शाखा फुटत नाहीत का ? अगदी तद्वतच. परंतु या मुख्य कथानकाला कितीही शाखा फुटल्या तरीसुद्धा महाभारत हे सर्वसामान्य माणसांच्या जीवनाचा आरसा असं म्हटलं, वा त्याला कुणी इतिहास ही संज्ञा दिली तर त्यात वावगे असे खरंच ठरू नये.

महाभारतातही असंख्य चरित्रं आहेत, परंतु यातील प्रत्येक चरित्राशी आपला, आपल्या स्वभावाचा, आपल्या जीवनचरित्राचा काहीसा मेळ जुळतो आहे असं वाटण्याइतपत ती जवळची नि आपलीच वाटतात. महाभारतातील कित्येक जीवनचरित्रांतून आपल्याला आपलंच जीवन पाहत असल्याचा भास होतो आणि म्हणूनच रामायणापेक्षा महाभारत आपल्याला अधिक जवळचं-किंबहुना आपलंच वाटू लागतं.

'खुर्ची'स्पर्धा आजही आपण पाहतोच ना ? केवळ तुटपुंज्या इस्टेटीसाठी सख्ख्या भावांतील वैराची परिणती संहारात झाल्याची असंख्य उदाहरणं आज आपल्याला नियतकालिकांतून वाचावयास मिळतात. दर्शन होणंही दुर्लभ राहिलेलं नाही आजच्या या समाजात. महाभारतात जी जीवनचरित्रं पाहायला मिळतात ती आजच्या समाजाचं हुबेहूब चित्रण करीत असतात. म्हणूनच ती आपल्याला आपली, आपल्या अगदी जवळची वाटतात आणि ती जवळची वाटतात म्हणूनच त्यातील काल्पनिकता कमी होऊन ती सत्य भासू लागतात.

महाभारतात पराक्रमाबरोबर स्वार्थ आहे, विषयांधता आहे, वैर आहे, उन्मत्तपणा आहे आणि अलौकिक असा त्यागही आहे. स्वार्थाचा विचार करीत असताना आपल्या नजरेसमोर चटकन दुर्योधन-दु:शासन ह्या धृतराष्ट्रपुत्रांच्या खलप्रवृत्ती साकार होतात. कुसंगतीमुळे प्रवाहपतित झालेला कर्णही मग आपल्या नजरेतून उतरतो. धर्मज्ञ विदुराच्या अलौकिक तत्त्वप्रणालीचे कौतुक करीत असताना कुटिल नीतीज्ञ कणक नि खलप्रवृत्तीचा शकुनीही आपल्या नजरेतून सुटत नाही आणि मग महाभारतातला त्याग शोधत असताना नजरेसमोर उभे राहतात आचार्य भीष्म, आचार्य द्रोण, आचार्य कृप.

प्रस्तुत कादंबरीत मी आचार्य भीष्मांचं त्यागमय, निरिच्छ असं जीवनचरित्र रेखाटायचा प्रयत्न केलेला आहे. महाभारत ज्याला ठाऊक नाही तो हिंदू नव्हे असं म्हटलं तर ते वावगं ठरू नये. प्रत्येक हिंदू महाभारत जाणतो असंच मी समजतो. परंतु सबंध महाभारत ज्ञात असताना आपल्या नजरेसमोर त्यातील असंख्य चरित्रं साकार होतात आणि मग त्यातील नेमकं श्रेष्ठ कोणतं हे ठरविताना आपल्यासारख्याला खरंच अडचण पडते. धर्मज्ञ युधिष्ठिर, श्रेष्ठ धनुर्धर पार्थ, बलवान भीमसेन, दानशूर कर्ण, दृष्टी असूनही हयातभर डोळ्यांवर पट्टी बांधून वावरणारी गांधारी, असाहाय्य कुंती, सत्तांधतेत उपेक्षित बनलेली पांचाली....एक की दोन असंख्य चरित्रं. यातलं श्रेष्ठ कोणतं ? नकळतच आपल्यासमोर हा प्रश्न उभा राहतो आणि मग सगळीच चरित्रं श्रेष्ठ वाटू लागतात आपल्याला. आपला स्वत:चाही गोंधळच होऊन जातो.

सुरुवातीला मीही गोंधळलो. पण अंती मीही निर्णय घेतला. कारण आचार्य भीष्मांच्यासारख्या एका निरिच्छ व्यक्तिमत्वानेच माझे मन जिंकले. अमृतवृत्ती स्वीकारलेल्या आचार्य द्रोणांनी माझ्यावर विजय मिळविला. महाभारतकालीन स्त्रीजीवनांतलं एक अजोड चरित्र-गौतमीने माझ्या मनात घर केलं आणि मग मी प्रथम द्रोण, नंतर गौतमी आणि आता भीष्म वाचकांसमोर सादर करतो आहे. तेही मूळ महाभारताशी प्रामाणिक राहून.

ऐतिहासिक वा पौराणिक स्त्री-पुरुषांची जीवनचरित्रं रेखाटत असताना समाजातील काही उच्चभ्रू-सूज्ञ-स्वत:ला अधिक सुसंस्कृत समजणारी मोजकी मंडळी मला नेहमी एक प्रश्न विचारतात,'कशाला हे जुने विषय चघळता आहात ? यातून काय साधायचं आहे तुम्हाला ?'

मी या मोजक्या लोकांना चांगलाच ओळखतो. समाजाचं नेतृत्व करणारी ही माणसं आहेत. यांना स्वत:चा असा नवा इतिहास घडविण्याचं वेड लागलेलं आहे. पण त्यांचं हे वेड स्वार्थावर आधारलेलं आहे हे आता कुणीही सामान्य माणूस ओळखू लागला आहे. स्वत:ला सुसंस्कृत समजणारी ही पुढारी मंडळी 'पुतळे'उभे करण्यात अधिक रस घेतात. ह्या निमित्ताने हजारो, लाखो रुपयांची वर्गणी गोळा करतात. शिल्पकाराशी खासगीत 'पर्सेन्टेज'ठरवितात, पुतळ्याखाली स्वत:चं नाव कोरून टाकतात, त्या समारंभसोहळ्यात अमाप मिरवितात आणि मग त्या पुतळ्याबरोबरच स्वत:ची अशी बंगली उभी करून शिवाय भावी पिढीसमोर पुतळ्याखाली कोरलेलं आपलं नाव शिल्लक ठेवून एक नवा इतिहास घडवितात. ग्रंथनिर्मितीत त्यांना रस वाटत नाही. खरं कारण हेच तर आहे.....

हे म्हणतात त्याप्रमाणं ऐतिहासिक वा पौराणिक जीवनचरित्रं ग्रंथरूपानं लिहिली गेली नाहीत तर आज ना उद्या, एक ना एक दिवस आपला हा आदर्श नि गौरवास्पद इतिहास खरंच पुसला जाईल आणि मग उरेल फक्त श्रीशिवछत्रपतींचा पुतळा आणि त्याखाली कोरण्यात आलेली या नव्या राजकारण्यांची नावे. उद्याची पिढी जो इतिहास पूर्णत: विसरलेली असेल ती साहजिकच प्रश्न करेल, 'हा पुतळा कोणाचा ?(त्याखालील कोरण्यात आलेल्या नाववाल्याचा ?)' आणि मग पुन्हा प्रश्न उरेलच, 'हे कोण होते ?'

माझ्यासारख्याला हा स्वार्थी-मतलबी आणि स्वत:चं घर भरू पाहणारा इतिहास घडवू नये असं वाटतं. म्हणूनच मी हा असा अट्टाहास करतो. ग्रंथरूपानं का होईना; ही आदर्श चरित्रं समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न करतो. मग त्यांनी मला कितीही नावं ठेवली, माझी अवहेलना केली तरी मी त्यांची फिकीर करत नाही.

खऱ्या अर्थाने आज समाजासमोर आदर्श असा उरलेलाच नाही. शिवाय आदर्शाकडे लक्ष द्यायला कुणाला फुरसतही नाही. कारण जो तो स्वत:च स्वत:चा आदर्श घडवू पाहतो आहे. सहकाराच्या नावाने स्वाहाकार हा त्यातलाच एक प्रकार. पण या नव्या आदर्शातून या पिढीनं कोणता विचार घ्यायचा ? कसं वागायचं ? भविष्य कोणत्या प्रकारानं घडवायचं? नि मग आपल्या हिंदू संस्कृतीचं कसं व्हायचं ? स्वातंत्र्यानंतरच्या पस्तीस-चाळीस वर्षांच्या कालावधीत आपल्याकडे उरलीय फक्त काही अंशी संस्कृती; पण आजचे आदर्श ही संस्कृतीच रसातळाला नेऊ पाहात आहेत. त्यांना हे करू द्यायचं का ? ते जर करू द्यायचं नसेल तर आपले खरेखुरे आदर्श जिवंत राहायलाच हवेत. तेही ग्रंथरूपानं. अन्यथा ही संस्कृती शिल्लक राहाण्याची शक्यताच कमी.

कुणीही निंदोत वा वंदोत; माझा अट्टाहास हा याचसाठी आहे.

पितामह ही माझी ब्याण्णवावी कादंबरी. वाचकांचं अलोट प्रेम, नि:पक्षपातीपणाचं मार्गदर्शन नि उत्साही स्वागत यामुळेच मी इथवर येऊन पोहोचलो आहे. त्यांचं ऋण हेच माझं बळ. या बळाच्या जोरावर मला यापुढची वाटचाल करावयाची आहे. त्यासाठी मला आपला अभिप्राय आवश्यक आहे. आपण या कादंबरीबाबतचा अभिप्राय कळविला तर मी आपला आजन्म ऋणी राहीन.

अस्मिता बंगला, प्लॉट नं. २०
दीपसेवक हौसिंग सोसायटी
रत्नाप्पा कुंभार नगर
कोल्हापूर.-४१६००७

– अनंत तिबिले

# शांतनू महाराज

गंगेवर आमचं आत्यंतिक प्रेम. गंगा आमचं विश्रामस्थान. आयुष्याचा बराचसा काळ आम्ही या गंगातीरावर निश्चिंतपणानं बसून भविष्याची सुखस्वप्ने रेखाटण्यात घालविलेला आहे. गंगेलाच साक्षी ठेवून असंख्य मोठमोठी मनोरथं उराशी कवटाळलेली आहेत. गंगेला आमच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. गंगा आमची सखी आहे. गंगा आमच्या सुखदु:खाची सांगाती आहे.

गंगेचं हे सान्निध्य एवढं रम्य आणि सुखद आहे की, प्रजाहितदक्ष नृपती शांतनू महाराज म्हणून आमची जी ख्याती आहे, तीही आम्हाला या सुरम्य सहवासापुढं निस्तेज वाटत आहे. आम्हीही माणूस आहोत-सामान्य माणूस. आणि सामान्य माणूस हा तसं पाहिलं तर स्तुतिप्रिय प्राणी. लौकिक, प्रतिष्ठा, मानसन्मान यामागे लागलेला. हे सारं प्राप्त करण्यासाठी आपला पराक्रम, पौरुषार्थ, शौर्य कारणी लावणारा. आम्हीही याला अपवाद नाही. स्वत:च विणलेल्या धाग्यांच्या घराला-कोळिष्टकाला स्वत:चं जग समजून त्यातच सदैव संचार करणाऱ्या कोळ्यागत माणूसही यातच नाही का गुरफटून जात; स्वत:चं अस्तित्व विसरत ? यापेक्षा अन्य असं आपल्याला काहीच नको असं नाही का म्हणत ? आम्हीही त्याला अपवाद नाही आणि कधी नव्हतोही. गंगातीरावरील या प्रचंड वटवृक्षाच्या छायेत फुरसत मिळेल त्या वेळी बसून राहतो. वटवृक्षाचा प्रचंड डेरेदार पर्णसंभार नदीतीरावरून वाहणाऱ्या मंद वायूलहरींच्या मदतीने आमच्यावर छत्रचामरं ढाळू लागतो. त्याच्या शीतल छायेच्या वर्षावात आमचं मन, गात्र न् गात्र, अंगोपांग सुखावतं-प्रसन्न बनतं.

गंगातीर....केवढा प्रचंड विस्तार ! या तीरावरून त्या तीरापर्यंत नुसतं गंगेचं अंगोपांग न्याहाळायचं म्हटलं तरी नजर फिरते ! नव्हे-नजरेच्या मर्यादित मापात हा प्रचंड विस्तार काही केल्या मावत नाही. काक-गिधाडांची मजल नाहीतरी केवळ

मस्तकावर लोंबकळणाऱ्या  कृष्णधवल मेघापर्यंतच असते. त्यांनी विस्तीर्ण, असीम नीलांबराचा वेध घेणं मूर्खपणाचंच मानावं लागेल. आम्ही हे जाणतो. गंगेचं प्रचंड अस्तित्व मानतो. तिच्या विशालकाय स्वरूपापुढे नतमस्तक होतो. कारण आम्ही नृप असलो तरी गंगेसमोर नगण्यच आहोत याची आम्हाला पुरेपूर जाणीव आहे.

आणि तरीही गंगेबद्दलच आमचं आकर्षण संपत नाही. तिच्या सहवाससुखाचं आम्हाला लागलेलं वेड सुटत नाही. तिच्या सान्निध्याचा मोह आम्ही दूर करू शकत नाही.

आम्ही गंगेच्या तीरावर येतो. नि का कुणास ठाऊक, आमच्या नित्याच्या चिंता मिटतात. आम्हाला लागून राहिलेल्या दु:खाचं अस्तित्व उरत नाही....औदासिन्य, निराशा...सारं सारं काही नाहीसं होतं. अस्ताचली चाललेल्या भास्कराकडे अगदी जवळून पाहणाऱ्या पश्चिमेच्या मुखावरील भाव नानाविध रंगानं झरझर बदलत नाहीत का, अगदी तस्सेच. स्वत:चं अस्तित्व विसरून त्या प्रचंड विशालकाय वृक्षाच्या छायेत विसावतो. आणि मग आमची नजर आम्हाला नकळत समोरच्या जलप्रवाहावर स्थिरावते.

गंगौघ संथपणानं पुढे सरकत असतो. सहस्ररश्मी भास्कराच्या सुवर्णकरांच्या स्पर्शानं त्याच्या अंगोपांगांवर सुवर्णमुलामा चढलेला असतो. मंद गंधयुक्त वाऱ्याच्या झोतानं त्यावर असंख्य इवल्या इवल्या लहरी माथा उंचावतात. एका पाठोपाठ एक वेगात धावणाऱ्या वेड्या लहरी केव्हा तीरावर पोहोचतात, आपटतात आणि आपल्यातील धवल स्फटिकासम तुषार उडवीत परस्परांत केव्हा विलीन होतात हे त्यांचं त्यांनाही कळत नाही. समजतही नाही !....मात्र त्या विरतात नि समर्पणाचं सुख प्राप्त करून तृप्त होतात.

मृगयेसाठी बाहेर पडल्यानंतर एखाद्या मृगामागून त्याचा वेध घेण्याच्या अभिलाषेने घोडदौड करताना जे सुख मिळतं त्याहीपेक्षा कित्येक पट अधिक सुख या जललहरींचा अवखळ चाळा पाहात असताना लाभतं. रणभूमीवर एखाद्या तुल्यबळ प्रतिस्पर्ध्याबरोबर दोन हात करणाऱ्याचा देह ज्या समाधानानं संतुष्ट होतो, त्याहीपेक्षा अधिक संतुष्टता किनाऱ्यावर येऊन आदळल्याने जे स्फटिकासम धवल तुषार उडतात ते पाहिल्यानं लाभते. आमच्या राजप्रासादात तशी कोणत्याही प्रकारची उणीव नाही. जनतेचा लोभही आहे सुदैवाने आमच्यावर. आम्हाला पाहताच प्रत्येकाच्या माना आमच्यासमोर आदराने लवतात. परंतु हे सर्व पाहूनही आम्हाला जे समाधान हवं असतं ते नेमकं आम्हाला पावत नाही. भव्य-दिव्य, उत्तुंग राजप्रासाद मग आमच्या नजरेत ठेंगणा बनतो. आमच्यापुढे नतमस्तक होणाऱ्या रयतेचा आमच्याबद्दलचा अभिमानही आम्हाला नकोसा होतो. ऐश्वर्यातही एक आगळंवेगळं असमाधान, मनाला खंत लावणारी हुरहुर सतावू लागते आणि मग आम्ही उठतो न् तडक गंगातीर गाठतो. आणि मग एकदा गंगातीर नजरेत भरला की, प्रकाशाच्या केवळ दर्शनानेच रात्रीचा अंधार विरघळून जातो, तद्वतच आमची अस्वस्थता नाहीशी होते. हुरहुर कमी होते.



आमचं मुखमंडल प्रसन्न बनतं.

त्या दिवशी आम्ही सकाळपासूनच काहीसे अस्वस्थ होतो. राज्यकारभाराच्या कुठल्याच कामात आमचं लक्ष लागत नव्हतं. कधीकधी कोणतंही निमित्त नसताना माणसाचं मनच माणसाला उगीचच एखादी हुरहुर लावून ठेवतं ना, अगदी तसंच झालं होतं. ज्या वेळी आमच्या मनाची अशी स्थिती होते त्या वेळी आम्हाला चटकन गंगेची आठवण येते. आजही तसंच झालं. आम्हाला गंगेची तत्काळ आठवण झाली. मग विलंबही केला नाही आम्ही. त्वरित निघालो.

आमच्या आज्ञेनुसार सेवकाने आमचा सुवर्णरथ तयार ठेवलेला होता. रथनीडेवर बसलेला सारथी हातात वेग धरून आमच्याच प्रतीक्षेत होता. आम्ही कुठे चाललो आहोत याची काहीच कल्पना नसलेला आमचा सामंत गण, आम्ही काहीतरी सांगू याची अपेक्षा करीत अधीर मनानं रथाजवळ उभा होता. पण आम्ही कुणाकडेच लक्ष दिलं नाही. एकटेच रथावर स्वार झालो आणि आमचा इशारा प्राप्त होताच सारथ्याने वेग ओढला. रथाचे उमदे जातिवंत अष्ट अश्व चौखूर उधळले. राजप्रासादासमोरच्या भव्य रस्त्याच्या दुतर्फा उभे असलेले सामंतांचे प्रासादही एकापाठोपाठ एक मागे सरकत होते आणि आपण गंगातीराच्या दिशेने जातो आहोत या केवळ कल्पनेनेच आमचे मनही प्रसन्न बनले होते.

रथाने राजमार्ग सोडला. रथनीडेवर बसलेल्या सारथ्याने कौशल्याने उजवे वळण घेतले. रथाचा वेगही काहीसा कमी झाला. आज आम्ही आमच्या लवाजम्याविना चाललो आहोत हे पाहून आमचे प्रजाजन विस्फारलेल्या नेत्रांनी आमच्याकडे पाहात होते. पण लगेचच स्वत:ला सावरून घेऊन तितक्याच आदराने आम्हाला प्रणामही करीत होते आणि आम्ही आमचा उजवा हात वर करून त्या प्रणामाचा सुहास्य वदनाने स्वीकार करीत होतो.

अल्पावकाशात वस्तीही मागे पडली. आता दोन्ही बाजूला विस्तृत शेती, वृक्षांच्या रांगा, एवढेच शिल्लक होते. वाऱ्याच्या झोतानं माथा लवविणारे वृक्ष आमच्या प्रसन्नतेत अधिकच भर घालीत होते. सूर्यास्ताची वेळ. पश्चिमेच्या अंकावर माथा टेकलेला सूर्य मनाला मोहवीत होता. वरच्या विशाल अंबरात सूर्याच्या आगमनाप्रीत्यर्थ पश्चिमेनं जणू काही नानाविध रंगांची रांगोळीच रेखाटली होती. नानाविध प्रकारच्या पक्ष्यांचे थवेच्या थवे घरट्याच्या ओढीनं वेगानं आपले पंख फडफडवीत पुढेपुढेच चाललेले होते. प्रत्येकाला घराची ओढ होती. पण आम्ही मात्र गंगेच्या सहवासाच्या ओढीने गंगातीराच्या दिशेनं प्रावत होतो.

सारथ्यानं विशिष्ट स्थळीच रथ थांबविला. आम्ही पायउतार झालो. मंद पावले टाकीत गंगातीराच्या दिशेनं चालू लागलो. पश्चिमेच्या हातातील रंगीबेरंगी रांगोळीचं पात्र उलटं झाल्यामुळेच की काय गंगेच्या पृष्ठभागावर नानाविध रंग पसरलेले होते. आम्हाला ते दृश्य फारच नयनमनोहर वाटलं. नकळतच आमच्या पावलांना गतीही आली. आम्ही नेहमीप्रमाणेच आमच्या त्या विश्रामस्थानापाशी पोहोचलो आणि समोरच्या पात्राकडे

अनिमिष नजरेने पाहात स्थानापन्न झालो. आता आमची नजरही अवखळपणानं वाहणाऱ्या वायूलहरींसारखी इतस्तत: भिरभिरू लागली होती. गंगेचं अंगोपांग चाचपत होती. त्यात स्वत:ला हरवून बसत होती. हळूहळू आमचं अस्तित्वच गंगामय होऊन गेलं होतं.

आम्ही अशा या अवस्थेत आणखीन किती वेळ बसून राहिलो असतो कुणास ठाऊक? पण त्याच वेळी आमच्या कानांवर मृदू, मधुर स्वरातले शद्ब आले-''प्रणाम राजन.''

आम्ही दचकलो. भानावर आलो. दचकलो, एवढ्याचसाठी की ते शब्द कुणा एका स्त्रीचे होते. आम्ही मान वळवून चटकन आवाजाच्या दिशेनं पाहिलं आणि आमची नजर तिथेच स्थिरावली.

आमच्यासमोर एक रूपगर्विता उभी होती. पूर्णत: अपरिचित. परंतु तरीही आमचा नि तिचा फार पूर्वीचा परिचय असावा अशी जाणीव करून देणारी. आम्ही एकटक पाहातच राहिलो तिच्याकडे.

विश्वनिर्मात्या विधात्याची ती एक अप्रतिम कलाकृती होती. तिच्या शरीराचा प्रत्येक अवयव घडविताना तिला घडविणाऱ्या कारागिराने घेतलेली मेहनत तिच्याकडे पाहताक्षणीच नजरेत भरत होती. तिचा विशाल कचभार आषाढात दाटी करून राहणाऱ्या कृष्णमेघासारखा भासत होता. याउलट, तिच्या शरीराचा वर्ण होता. तिच्या सौष्ठवपूर्ण शरीराला लाभलेली उंची तितकीच प्रमाणबद्ध आणि आकर्षक होती. किंचित उभट चेहरा, उभट चेहऱ्याला शोभणारी धारदार नासिका, धनुष्याकृती भ्रुकटी, काळेभोर पाणीदार डोळे, गुलाबपाकळ्यांहूनही अधिक नाजूक अधरद्वय, निमुळती हनुवटी, लालबुंद ओठांआडून मधूनमधून डोकावणारी मौक्तिकमालेसम शुभ्र दंतपंक्ती, आणि ओठांवरचं मधुर हास्य.... सारंच काही विलोभनीय होतं. ओळखीचं आणि परिचितही.

आम्ही तिच्यात एवढे स्वत:ला हरवून गेलो की, तिच्या प्रणामाचा स्वीकार करण्याचंही भान आम्हाला राहिलं नाही.

ती हसली. एखाद्या निर्झराच्या मधुर खळखळाटासारखं वाटलं तिचं हसणं. आपली नाजूक मान लववून पुन्हा एकदा ती त्याच मृदू, मधुर स्वरात म्हणाली,''प्रणाम राजन !''

आता मात्र आम्ही भानावर आलो. हसतमुखानं तिच्या प्रणामाचा स्वीकार केला. आणि तेवढ्याच मधुर स्वरात उत्तरलो,''देवी, आपली ओळख असावीशी वाटते. परंतु तरीही नाव आठवत नाही. कृपा करून नाव सांगाल तर मी आपला ऋणी होईन.''

''गंगा !''

तिच्या मुखातून एकच शब्द बाहेर पडला. पण केवळ या शब्दाच्या श्रवणाने आम्हाला कल्पनातीत आनंद झाला. आम्हाला तो लपविताही आला नाही. विश्वास न बसल्यासारखं आम्ही विचारलं,''खरंच, आपलं नाव गंगा ?''



''हो.''

''आपल्या सौंदर्याला शोभून दिसणारं नाव आहे हे.''

''आपण असंच काहीतरी बोलाल अशी अपेक्षा होती या दासीची.''

''गंगा दासी असू शकत नाही. आम्ही तर तिला देवी समजतो.''

''पण मी मात्र आपली दासी होण्याचा निर्धार करून आपल्या भेटीसाठी आले आहे. दासीला दासीच राहू द्या. तिला 'सन्मानार्थक' संबोधून नाहक मोठेपणा देऊ नका. कृपा करून आपण माझी एवढी विनंती ऐका.''

आम्ही हसलो. प्रथमदर्शनीच का कुणास ठाऊक, आमच्या मनात तिच्याबद्दल एक आगळीवेगळी जवळीक निर्माण झाली होती. एक जिव्हाळा वाटू लागला होता. आपलं जे काही हरवलेलं होते ते आज सापडल्याचा भास होऊ लागला होता.

-आणि आम्हाला नकळतच आमच्या नजरेसमोर आमचे तात उभे राहिले होते. गतस्मृतीत अडकल्यामुळेच तिच्या प्रश्नाचं उत्तर देण्याचे भानही आम्हाला उरलं नव्हते.

त्या दिवशी आमच्या ध्यानीमनी-स्वप्नीही नसताना आमचे तात प्रदीप महाराज यांनी आमच्या महालात प्रवेश केलेला होता. अगोदर कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता तातांनी आमच्या महालात केलेला हा प्रवेश आम्हाला आश्चर्याचा धक्का देणारा होता. तरीही आम्ही स्वत:ला सावरून तातांना आदराने प्रणाम केला.

तात तिथल्या एका आसनावर विराजमान झाले. त्यांची मुद्रा गंभीर दिसत होती. मात्र त्यांनी अजून बोलायला सुरुवात केलेली नव्हती.

''तात-'' आम्हीच हाक मारली.

''बोल शांतनू.''

''आपली आज्ञा झाली असती तर आम्ही स्वत:च जातीने दर्शनाला हजर झालो असतो. आपण व्यर्थ कष्ट घेतलेत.''

''पुत्रा, आम्हाला तुझ्याशी जे काही बोलायचं आहे ते फक्त तुझ्यात आणि आमच्यातच राहावं अशी आमची इच्छा आहे, म्हणूनच कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता आम्ही स्वत:च आलो आहोत....!''

''आज्ञा करावी तात....''

तात क्षणभर काहीच बोलले नाहीत. मात्र कसल्यातरी गहन विचारात गढून गेल्यासारखे दिसले आम्हाला. आम्हीही काही बोलून त्यांची विचारशृंखला तोडण्याचा बिलकूल प्रयत्न केला नाही.

''शांतनू-''

''आज्ञा करावी तात...''

''काही दिवसांपूर्वी आम्हाला गंगातीरावर एक स्त्री भेटली होती...''

''प्रजाजनांपैकी होती का ती ?''

''नाही.''

''मग ?''

''ती कोण होती ते जाणून घेण्याचा तू प्रयत्न करू नकोस.''

''जशी आज्ञा तात !''

''प्रथमदर्शनीच त्या स्त्रीबद्दल आमचं मत चांगलं बनलं. आम्हाला तिचं रूप, तिची मर्यादशीलता, तिचे गुण सारं सारं काही आवडलं आणि मग त्याच क्षणी आम्ही तिच्याकडे एका गोष्टीची मागणी केली.''

''काय मागितलंत तात आपण तिच्याकडे ?''

''वत्सा, अलीकडे आम्ही तुझ्या विवाहाबद्दलचाच विचार करीत होतो. पण आम्हाला तुला अनुरूप असं कुणी दिसत नव्हतं. पण तिला पाहिलं आणि आम्हाला हवं ते प्राप्त झालं. आम्ही तुझ्यासाठी तिला मागणी घातली.''

आम्ही काहीच बोललो नाही. केवळ मस्तक नमवून तातांच्या समोर तसेच उभे राहिलो.

''शांतनू, आमचा शब्द वाया गेला नाही.'' तातच उद्‌गारले आणि पुढे म्हणाले,''तिने आमची मागणी तत्काळ मान्य केली.'' तरीही आम्ही मौनच स्वीकारलं.

''पुत्रा, आमचा निर्णय हा आम्ही केवळ तुझं हित पाहूनच घेतलेला आहे, प्रथम आम्ही तुझ्या सुखाचा विचार केला आणि मगच या निर्णयाप्रत पोहोचलो आहोत. अर्थात तू आमच्या निर्णयाचा अवमान करणार नाहीस याची आम्हाला खात्री होती. म्हणूनच आम्ही हे धाडस केलं आहे.''

''तात, आम्ही आपल्या आज्ञेबाहेर खरंच नाही. आपला निर्णय आम्हाला प्रमाण आहे.''

''आमची हीच अपेक्षा होती तुझ्याकडून.''

आम्ही काहीच बोललो नाही.

''शांतनूऽऽ''

''बोलावं तात, आपण...''

''आज ना उद्या, एक ना एक दिवस ती स्त्री तुला स्वत:लाच कुठे ना कुठे तरी भेटेल. प्रथमदर्शनीच ती तुला पसंत पडेल. तिचं असामान्य लावण्य, विनयशीलता, सलज्जता...सारं काही तुझ्या मनात भरेल. तू स्वत:च तिला मागणी घालशील. ही मागणी घालीत असताना तिच्या नावापेक्षा तिला अधिक काहीच विचारू नकोस. तिच्या काही अटी असतील तर त्यांनाही विरोध करू नकोस. शक्यतो तिच्या सगळ्या गोष्टी मान्य करण्यातच तुझं हित आहे हे विसरू नकोस.''



''तात, आम्ही आपल्या आज्ञेप्रमाणे वागू.''

आम्ही वचन दिलं आणि तात उठले. अधिक काही न बोलता जसे आले तसेच आमच्या महालातून निघून गेले. काही दिवसांपूर्वी घडलेला हा प्रसंग आमच्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा राहिला.

''राजनऽऽ,'' आमच्या कानांवर तीच मृदू-मधुर हाक आली. आम्ही भानावर आलो. गतस्मृतीतून बाहेर पडलो.

''कसला विचार करीत आहात ?''

''विचार ? कसला नाही.'' आम्ही घाईघाईनं उत्तरलो.

''मग आपण गप्प का ? या दासीचा प्रस्ताव आपल्याला मान्य नाही का ?''

''देवी, रत्नाचं मोल आम्ही जाणतो. त्याचा अव्हेर करण्याचा प्रमाद आम्ही आमच्याकडून खचितच होऊ देणार नाही.''

''राजन, आपण या दासीचा प्रस्ताव मान्य केलात हे मी माझं परम भाग्य समजते. आपली मान्यता ऐकली नि ही दासी धन्य झाली. दासीच्या काही अटी आहेत. आपण कृपावंत होऊन त्या मान्य कराव्या, अशी ही दासी आपल्याला विनंती करीत आहे.'

''बोल देवी, मोकळ्या मनानं बोल. आम्ही प्रसन्न आहोत तुजवर.''

''राजन, विवाहानंतर ही दासी जे काही बरंवाईट करेल, त्याची जबाबदारी तिच्यावर राहील. आपण फक्त त्या बऱ्यावाईटामागचं निमित्त विचारू नये. शिवाय या दासीला विरोधही करू नये. दुर्दैवानं आपल्याकडून असं काही घडलंच, तर त्याच क्षणापासून मला आपल्यापासून वेगळं व्हावं लागेल.''

''देवी, तुझी प्रत्येक अट मान्य आहे आम्हाला. तुझ्या हातून तसं काहीच वावगं घडायचं नाही याबद्दल खात्री आहे आमची. एवढं सुंदर रूप, फुलाहून अधिक असं कोमलांग एखादं अघटित असं कृत्य करायला प्रवृत्त होईल यावर आमचा विश्वासच बसत नाही. म्हणूनच तर आम्ही तुझी प्रत्येक अट अगदी नि:शंकपणानं मान्य करतो आहोत...''

आमची मान्यता मिळाली आणि ती मोहकपणानं हसली. आम्ही तिच्या मधुर हास्यात तेव्हाच विरघळून गेलो.

अन्य कुणाच्या मान्यतेचा प्रश्नच नव्हता. तातांनी सांगितल्याप्रमाणेच सारे काही घडले होते. अगदी प्रथमदर्शनीच तिने आमचे मन जिंकले होते. दोष लावण्यासारखं तिच्यात आम्हाला काहीही दिसलं नव्हतं. फक्त तिने घातलेल्या अटी काही अंशी विचित्र होत्या खऱ्या; परंतु एका नाजूक कलिकेसम असणाऱ्या हळव्या मनाच्या स्त्रीकडून काही अघोरी, अमानवी, अमानुष कृत्य घडेल असं आम्हाला स्वप्नातही वाटत नव्हतं आणि म्हणूनच आम्ही मागचा पुढचा कोणताही विचार न करता तिला संमती दिली होती.

आमचा विवाह कुणा सामान्याचा विवाह नव्हता. आमचा विवाह ठरल्याची गोष्ट कानांवर पडताच आमच्यापेक्षा आमचे प्रजाजन आनंदित बनले होते. देशवासियांच्या उल्हासाला उधाण आलं होतं. आमच्या इच्छेचं देशवासियांनी गुढ्यातोरणे उभारून तेवढंच उत्साही स्वागत केलं होतं. राजप्रासाद आणखीनच वैभवानं नटला होता. उचित समयी देशोदेशीच्या राजेरजवाड्यांना निमंत्रणं धाडण्यात आली होती. त्यांची सरबराई करण्यात सामंतांना अमाप मेहनत घ्यावी लागत होती. राजप्रासादासमोर अतिभव्य असा मंडप उभारण्यात आला होता आणि मग एका सुमुहूर्तावर श्रीअग्निनारायण आणि देवाब्राह्मणांच्या समोर आम्ही गंगेचे आणि गंगा आमची बनली होती. कुरुकुलाने स्वामिनी म्हणून तिचा स्वीकार केलेला होता. हिरा सुवर्णाच्या कोंदणातच शोभून दिसतो, अगदी त्याप्रमाणेच घडलं होतं.

जणू वसंत ऋतूच आला होता. वृक्षन्वृक्ष मोहरला होता. झाडाझुडपांना बहर आला होता. झाडाझुडपांवर फुलेच फुले फुलली होती. एकांतप्रिय स्वभाव आमचा. परंतु फुलाला गंध प्राप्त झाल्यानंतर जसं फुलाचं मोल वाटतं, अगदी त्याप्रमाणेच गंगा आमची झाली आणि आमचा एकांत तर संपलाच, परंतु जीवनाला एक वेगळं मोलही प्राप्त झालं. गंगा आणि आम्ही नेहमीप्रमाणेच गंगातीरी आमच्या नेहमीच्याच विश्रामस्थानावर विराजमान होत होतो. पण आता गंगेच्या प्रवाहाकडे पाहात असताना गंगेच्या पृष्ठभागावर अवखळपणाने खेळणाऱ्या जललहरींचा खेळ डोळ्यांत साठवत असताना किंवा जललहरी किनाऱ्यावर आपटल्यानंतर त्याच्या शुभ्रधवल अशा तुषारांचं सौंदर्य न्याहाळत असताना आम्हाला आणखीनच आगळावेगळा आनंद लाभत होता.

आणि प्रहराप्रहरानं काळ मागे पडत चालला होता. पण आम्हाला त्याचंही भान नव्हतं. नुसत्या पराक्रमानंच पुरुषार्थ साधता येतो असं जे आम्हाला आजपर्यंत वाटत होतं त्यात आमची काहीतरी चूक होत होती, असं आज आम्हाला वाटू लागलं होतं. पौरुषार्थ हा तसं पाहिलं तर गंगेच्या प्रवाहासारखाच विस्तीर्ण, विशाल ! त्याला तीर नसता तर त्याला आता प्राप्त झालेलं रूप आणि सौष्ठवही प्राप्त झालं नसतं. तो दिशाहीन कुठेही भरकटत गेला असता. स्त्रीसहवास हा नाहीतरी या तीरासारखाच ! या तीराने पुरुषाच्या पराक्रमाला दिशा दाखवायची, त्याला धार चढवायची. एक नवा जोम, नवा उत्साह, नवी चेतना आमच्या सर्वांगात संचारली. काहीतरी करून दाखविण्याची इच्छा निर्माण झाली आम्हाला. वरच्या विस्तीर्ण आकाशात झेप घ्यावी, वायुलहरींपेक्षाही प्रचंड वायुवेगानं धावत सुटावं, काहीतरी भव्यदिव्य करून दाखवावं, असंच वाटू लागलं आम्हाला आणि त्याच दृष्टीनं आमची पावलंही पडू लागली.

✦✦



# गंगा

आमच्या दैवात लिहिल्याप्रमाणे आमची पावलं पडली खरी. वास्तविक शांतनू महाराजांची साथ म्हणजे अप्राप्याची प्राप्ती. ती लाभणं महत्‌भाग्याचं. आमच्या ठिकाणी अन्य कोणी स्त्री असती तर ती सुखसागरात बुडून गेली असती. वरच्या आभाळापर्यंत हात पोहोचले असते तिचे. पण आम्ही....

एक सामान्य स्त्री म्हणून जन्माला आलो असतो, तर प्राप्त झालेलं सुख आणि समाधान यथेच्छपणे उपभोगता तरी आलं असतं. पण गंगा सामान्य स्त्री म्हणून जन्माला आली नाही, याचा आज मात्र तिला खेद वाटतो आहे. शक्य असतं तर या गंगेनंही आहे हे समाधान टिकविण्यासाठी प्रत्यक्ष विधिलिखिताशी दोन हात केले असते, आपलं सामर्थ्य पणाला लावून झुंज दिली असती; परंतु प्राप्त झालेलं अप्राप्य कोणत्याही परिस्थितीत सोडलं नसतं.

पण, गंगा एक सामान्य खेळणं – नियतीच्या हातातलं. नियती सांगेल त्याप्रमाणं खेळायचं हेच तर तिच्या हाती. ती अन्य काहीच करू शकत नाही. आज या क्षणी गंगेला काय कमी आहे ? भव्यदिव्य अशा प्रासादात निवास आहे आमचा. आमच्या सेवेला असंख्य आणि तत्पर अशा दासदासी आहेत. आम्ही कुरुकुलाच्या स्वामिनी आहोत. काय कमी आहे शांतनू महाराजांच्यात ? त्यांचं उमदं व्यक्तिमत्व, त्यांच्यातला पराक्रम, त्यांचा लौकिक, त्यांना लाभलेला मानमरातब, त्यांचा अधिकार सारं काही दृष्ट लागण्यासारखं आहे. अशी साथ लाभणं स्त्रीच्या दृष्टीनं परम भाग्याचीच गोष्ट नाही का ?

तरीही आम्ही समाधानी नाही. आता कुठेतरी एक बोचणी लागून राहिली आहे आमच्या मनाला. आपण एका निष्पाप जिवाला फसवतो आहोत, ही जाणीव काही केल्या मनातून निघतच नाही आमच्या आणि त्यामुळेच एवढी सत्ता, एवढं वैभव आणि एवढं समाधान प्राप्त होऊनही एकांतात असताना आमच्या मुखावरचं औदासिन्य आम्हाला सोडून जातच नाही.

त्या दिवशी असंच झालं होतं. त्या दिवशी आम्ही आमच्या महालात उदास मुद्रेने महालाच्या खिडकीतून बाहेर पाहात उगाचच बसून होतो. ओठांवरचं हसू मावळलं होतं. नजर भकास बनली होती आणि त्याच वेळी आम्हाला कल्पनाही नसताना शांतनू महाराज आमच्यासमोर येऊन उभे राहिले होते. पण आम्ही आमच्या दु:खात एवढ्या चूर होऊन गेलेलो होतो की, त्यांच्याकडे आमचे लक्ष गेले नव्हते.

''गंगा'' त्यांची हाक कानांवर आली आणि आम्ही भानावर आलो. त्यांचा आवाज चटकन ओळखला. तत्काळ आम्ही आमच्या मुखावरचे भाव पुसण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. मात्र, डोळ्यांत गोळा झालेले अश्रू आम्हाला खूप प्रयत्न करूनही लपविता आले नाहीत. आम्ही ते लपविण्यासाठी मान खाली घातली, पण त्यांनी आपल्या तर्जनीने हनुवटी वर केली आणि ते नेहमीच्याच मधुर स्वरात म्हणाले, ''गंगा, नजर वर करून आमच्याकडे पाहा.''

पण आमची नजर वर झालीच नाही.

''तू कितीही लपविण्याचा प्रयत्न केलास तरी तुझ्या डोळ्यातील अश्रू आम्ही पाहिले आहेत आणि त्यांनी आम्हाला केवढा तरी धक्का दिला आहे. आमचंच काहीतरी चुकलं असावं. आम्हाला वाटत होतं की, आम्ही सारं काही तुला दिलं आहे. हे वैभव, आमचं प्रेम आम्ही सर्वार्थानं तुझ्यावर उधळलेलं आहे. एवढंही करून ज्याअर्थी तुझ्या डोळ्यांत अश्रू उभे राहतात त्याअर्थी आम्हीच कुठेतरी कमी पडत आहोत, याची आज जाणीव होते आहे आम्हाला. तसं पाहिलं तर गंगे, विवाहानंतर आम्ही तुझ्यापासून काहीच लपविलेलं नाही. तूही आपल्या मनात काही ठेवलं असशील असं आम्हाला वाटत नाही. आजही आमची तुझ्याकडून हीच अपेक्षा आहे. कृपा करून तुला आमच्यात कोणती उणीव दिसली, ते सांग. तुझ्या सुखासाठी आम्ही तत्काळ ती दूर करू. गंगे, तुझं सुख हेच तर आमचं सुख आहे. निदान हे ध्यानी घेऊन तरी तू आपलं मन आमच्यासमोर उघड कर.''

''राजन, आपला काहीतरी गैरसमज होतो आहे. अश्रू दु:खाचंच प्रतीक असतात असं कुणी सांगितलं आपल्याला ? अधिक समाधान प्राप्त झाल्यानंतरही डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहतात माणसाच्या. या दासीच्या डोळ्यांतले अश्रू आनंदाचेच आहेत.''आम्ही नकळत खोटं बोलून गेलो. खोटं बोलून आम्ही त्यांचं समाधान केलं; परंतु आपण एका भोळ्या जिवाला फसविल्याचं दु:ख मात्र आम्हाला आतून टोचतच राहिलं. हे दु:ख बरोबर घेऊन आम्हाला आमची वाटचाल करायची आहे. ज्याने निरिच्छ वृत्तीनं आपलं सर्वस्व आमच्या पदकमलावर वाहिलं आहे त्याला आणखी दु:खच द्यायचं आहे. याशिवाय आम्हाला अन्य असं काहीच करता येण्यासारखं नाही.

गेल्या सात वेळा आम्ही असंच केलं आहे. मातृत्व म्हणजे स्त्रीजीवनाचं खरंखुरं वैभव ! स्त्रीजीवनाच्या यशाची सांगता म्हटलं तर त्यात काहीच चूक ठरू नये. पण आम्ही मात्र,



मातृत्व लाभूनही अभागीच ठरलो आहोत. सलग सात वेळा सुदैवाने पुत्र लाभले आम्हाला; परंतु हे वसू आहेत, केवळ नाइलाजाने यांनी आमच्या उदरी जन्म घेतलेला आहे आणि जन्मत:च त्यांना गंगार्पण करून त्यांची या मानवयोनीतून मुक्तता करण्याची जबाबदारी नियतीनं आमच्या माथ्यावर टाकलेली आहे. याची कल्पना फक्त आम्हालाच आहे. मातृत्वाची ही जबाबदारी स्वीकारत असताना आम्ही अविवाहित असल्यानं ही जबाबदारी केवढी कठीण, असह्य आणि न पेलवणारी आहे याची आम्हाला त्या वेळी कल्पनाही नव्हती. ही जबाबदारी पार पाडीत असताना आपल्याला किती यातना, केवढे कष्ट आणि किती दु:ख भोगावं लागणार आहे, याची कल्पना मातृत्व लाभल्यानंतरच आम्हाला आलेली आहे.

आम्हाला तो पहिला प्रसंग आताही आठवतो आहे. नऊ मास आणि नऊ दिवसांनंतर असह्य वेदना सहन करून आम्ही आमच्या प्रथम पुत्राला जन्म दिलेला होता. त्याच्या राजबिंड्या दर्शनानंच आम्ही तृप्त झालो होतो. आम्ही भोगलेल्या यातना, सहन केलेल्या जीवघेण्या वेदना तत्काळ विसरून मोहरलो होतो. आम्ही केवढ्यातरी प्रेमानं त्याला आमच्या छातीशी कवटाळलं होतं आणि त्याच वेळी कुणीतरी आम्हाला सांगितलं होतं,'गंगे, मोहात पडलीस ना ?'आम्ही पाहातच राहिलो होतो तिकडे. एक अस्पष्ट धूसर अशी आकृती आमच्याकडे उभी होती. काहीशा कठोर नजरेनं आमच्याकडे पाहात होती आणि पुढे म्हणत होती,'मातृत्व लाभलेल्या स्त्रीचं हे असंच होतं. तिला मोह सुटतच नाही पण तुझं मातृत्व मात्र अन्य स्त्रियांच्यासारखं नाही. हा तुझा भोग आहे आणि या भोगातून तुला लवकर सुटायचं आहे. म्हणून ऊठ आणि तुझ्यावर सोपविलेल्या जबाबदारीतून मुक्त होण्यासाठी तू उराशी कवटाळलेल्या आपल्या पुत्रासह या राजप्रासादातून बाहेर पड. गंगा तुला बोलावते आहे...'

ते शब्द तीक्ष्ण बाणासारखे आमच्या उरात घुसले. आमचं मातृत्व विव्हल बनलं. आमच्या पुत्राला छातीशी कवटाळून अश्रूभरल्या नेत्रांनी गदगद स्वरात आम्ही म्हणालो, 'हे सगळं खोटं आहे रे ! सारं क्षणिक आहे. आम्ही तुझ्या माता नाही. तू आमचा पुत्र नव्हेस. आपला सहवास हा केवळ एवढ्याच क्षणाचा होता. आम्ही दुबळ्या आहोत रे ! आम्हाला आमच्या जबाबदारीतून मुक्त व्हायलाच हवे.'

आम्ही त्याला आणखीनच छातीशी कवटाळलं. महालात कुणीच नाही याची खात्री करून घेतली आणि पावलांचा आवाज होऊ न देता, दाटून आलेला हुंदका गळ्याबाहेर पडणार नाही याची खबरदारी घेतली आणि डोळ्यांतल्या अश्रूंनी आमच्या लाडक्याला चिंब भिजवलं आणि मग कठोर मनानं मातृत्वावर दगड ठेवून आम्ही राजप्रासादाबाहेर पडलो.

रात्रीचा दुसरा प्रहर असावा तो. सगळं नगर गाढ निद्रेत होतं. नगरावर काळोखाचं साम्राज्य पसरलेलं होतं. मधूनच एखाद्या श्वानाचं विव्हळणं कानावर येत होतं. वातावरण